# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 16 March 2026**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १६ मार्च २०२६ सायंकाळी ०६.१०**

********

- गटशेती मोहिमेत यंदा दहा लाख शेतकऱ्यांच्या समावेशाचं राज्य सरकारचं उद्दीष्ट
- खासगी रुग्णालयं आणि शुश्रुषागृहांच्या आढाव्यासाठी समिती स्थापण्याचा सरकारचा निर्णय
- बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवार न देण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा निर्णय
- साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर–ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या ‘काळ्या निळ्या रेषा’ या आत्मचरित्राचा गौरव

आणि

- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एक एप्रिलपासून “माझं गाव, आरोग्य संपन्न गाव” विशेष अभियान

********

गटशेती मोहिमेत दहा लाख शेतकऱ्यांचा या वर्षी समावेश करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पाणी फाऊंडेशन संघटनेसोबत झालेल्या बैठकीनंतर ते बोलत होते. गटशेतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला असून, याबाबत आतापर्यंत झालेल्या प्रशिक्षण कार्यशाळांना चांगला प्रतिसाद मिळाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

********

राज्यातल्या सर्व खासगी रुग्णालयं आणि शुश्रुषागृहांचा आढावा घेण्यासाठी, आणि नोंदणी नसलेल्या अशा आस्थापनांवर कारवाई करण्यासाठी एक समिती स्थापन

करण्यात येणार आहे. नगरविकास खात्याचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत ही घोषणा केली. आमदार चित्रा वाघ यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला सामंत उत्तर देत होते. नगरविकास खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव या समितीचे अध्यक्ष असतील. याशिवाय, आवश्यकतेनुसार इतर अधिकाऱ्यांना समितीत घेण्याचे अधिकार अध्यक्षांना दिले जातील.

****

जलजीवन अभियानात महाराष्ट्रात आतापर्यंत या अंतर्गत २६ हजार ४९९ कामं पूर्ण झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. या अभियानांतर्गत राज्यभरात ५१ हजार ५६० योजना सुरू असून यापैकी २५ हजार ६१ योजना प्रगतीपथावर आहेत असं गुलाबराव पाटील यांनी सांगितलं.

****

महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना मोफत उपचार देणं रुग्णालयांना बंधनकारक असून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जात आहे असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. अशा ३३७ प्रकरणात ६० लाख ४७ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, तसंच १२ रुग्णालयांवर कारवाई केल्याची माहिती आबीटकर यांनी दिली.

दरम्यान, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यशासनाने केंद्राप्रमाणे निधी देण्याची मागणी बबनराव लोणीकर यांनी केली आहे. याबाबत लोणीकर यांनी पत्रकारांना अधिक माहिती दिली.

**बाईट – बबनराव लोणीकर**

****

बोगस प्रमाणपत्र प्रकरणी हिंगोलीतील शाळेविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज विधानसभेत दिली. विद्या शक्ती शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेनं मराठी माध्यमाची शाळा इंग्रजी माध्यमाची असल्याचे दाखवत कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून प्रमाणपत्र सादर केले होते. या प्रकरणी १५ दिवसांत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जालना आणि बीडसह राज्यातील इतर भागांतील अशा २३ शाळांवर आधीच कारवाई करण्यात आल्याची माहिती सावे यांनी दिली.

****

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवार न देण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं घेतला आहे. अजित पवार यांच्या निधनानं रिक्त झालेल्या या जागेवरुन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. राहुरीच्या संदर्भात महाविकास आघाडीतले पक्ष एकत्र बसून निर्णय घेतील, अशी माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.

****

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान झालं. १० राज्यांमधल्या ३७ रिक्त जागांपैकी २६ जागांवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यात महाराष्ट्रातल्या ७ जागांचा समावेश आहे. बिहारमधे ५ जागांसाठी, ओदिशात ४, आणि हरियाणात दोन जागांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडली.

****

एलपीजी आणि सीएनजीच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्यात प्रत्येक जिल्ह्यात नेमलेल्या समित्यांनी आत्तापर्यंत १ हजार २०८ सिलिंडर जप्त केले असून २३ गुन्हे दाखल करून १८ जणांना अटक केल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी आज विधान परिषदेत दिली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३३ लाख ६६ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणके मार्गक्रमण केलेलं शिवालिक हे जहाज आज गुजरातच्या मुंद्रा पोर्टवर दाखल झालं. हे जहाज सुमारे ४६ हजार मेट्रिक टन एलपीजी घेऊन आलं आहे. नंदादेवी हे दुसरं जहाज उद्या कांडला बंदरावर पोहोचणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

साहित्य अकादमीचे विविध पुरस्कार आज जाहीर झाले. ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या ‘काळ्या निळ्या रेषा’ या आत्मचरित्राला २०२५ चा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. बाविस्कर हे जळगाव जिल्ह्याच्या पिंपराळा इथल्या पीएम मुंदडे माध्यमिक विद्यालयातले सेवानिवृत्त कलाशिक्षक आहेत. या पुरस्काराबाबत आकाशवाणीशी बाविस्कर यांनी, आनंद व्यक्त करतांनाच, आपण निरपेक्ष भावनेनं काम करत राहण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले –

**बाईट – चित्रकार राजू बाविस्कर**

दरम्यान, २४ भारतीय भाषांतील साहित्यकृतींना आज पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये आठ कवितासंग्रह, चार कादंबऱ्या, सहा लघुकथा संग्रह, आदी साहित्यकृतींचा समावेश आहे. एक लाख रुपये आणि सन्मान पत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात येत्या १ एप्रिलपासून "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" हे विशेष अभियान राबवण्यात येणार आहे. ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना 'आरोग्य संपन्न ग्राम' घोषित केलं जाईल तसंच पुरस्कारच्या स्वरुपात रोख रक्कम दिली जाईल. राज्यस्तरीय पुरस्कार ५ कोटी ते २ कोटी रुपयांपर्यंत असतील, याव्यतिरिक्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका, आरोग्य सेवक आणि डॉक्टरांचाही विशेष गौरव केला जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

परभणी इथं वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात जिल्हास्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटन आज जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते झालं. महोत्सवात परिसंवाद, चर्चासत्र, तसंच कृषी उत्पादनांची उत्पादक ते ग्राहक थेट विक्री केली जाणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी चव्हाण यांनी अधिक माहिती दिली, ते म्हणाले –

**बाईट – जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण**

****

माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांचा नांदेडमध्ये पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे. महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासह टिपू सुलतान यांचा पुतळा उभारण्याची मागणी केली. दरम्यान, महापालिकेच्या या सभेत स्थायी समितीच्या १६, महिला आणि बालविकास समिती आणि ८ स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

****

लातूर जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष पदाच्या आज झालेल्या निवडणुकीत भाजप - राष्ट्रवादी काँग्रेसने मिळून सत्ता स्थापन केली. अध्यक्षपदी भाजपच्या उषा पाटील तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे दयानंद सुरवसे यांची निवड झाली.

****

ऑस्ट्रेलियाचे कॉन्सुल जनरल पॉल मर्फी यांनी छत्रपती संभाजीनगर इथं भारतीय क्रीडा प्राधिकरण – साईच्या राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र- एनसीओईला आज भेट दिली. या भेटीदरम्यान, मर्फी यांनी खेळाडू, प्रशिक्षक आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

****